सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अमरावतीत इंधन तुटवड्याची अफवा; जिल्हा प्रशासनाचे नागरिकांना शांततेचे आवाहन

**अमरावती:** गेल्या काही दिवसांपासून अमरावती शहरासह जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याच्या अफवा सोशल मीडियावर पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले असून नागरिकांनी घाबरून न जाता संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. शहरातील अग्रसेन पेट्रोल पंप, (आयटीआय कॉलेज समोरील पंप ) तसेच राजेश आणि विदर्भ गॅस एजन्सी या ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी सर्व ठिकाणी साठा पुरेसा असल्याचे निदर्शनास आले. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी गॅस एजन्सीवर पिण्याचे पाणी, ग्राहकांना बसण्यासाठी आसनव्यवस्था, सावलीसाठी शेड उभारण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव

### ई-गव्हर्नन्समध्ये अमरावतीची राज्यात उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी २९ मार्च

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री १५० दिवस ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री सभागृह, मुंबई येथे आयोजित समारंभात गौरव करण्यात आला.

या राज्यस्तरीय मूल्यमापनात अमरावती महानगरपालिकेने २९ महानगरपालिकांमधून २०० पैकी १७९.५० गुण मिळवत पाचवा क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, विदर्भ व मराठवाडा विभागातून या मानाच्या यादीत स्थान मिळवणारी अमरावती महानगरपालिका ही एकमेव संस्था ठरली आहे.



आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख उपक्रमांमुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. मर्यादित संसाधनांमध्येही मोठ्या महानगरपालिकांशी स्पर्धा करत मिळवलेले हे यश विशेष उल्लेखनीय मानले जात आहे.

महानगरपालिकेने राबविलेल्या प्रमुख उपक्रमांमध्ये माय अमरावती व्हॉट्सअॅप चॅटबॉट, चॅनेल व मोबाईल अॅपद्वारे नागरिकांशी सुलभ संवाद, रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारित कूल रूफ उपनियम २०२५, शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत सेवांचे डिजिटायझेशन व नवीन वेब पोर्टल्सची निर्मिती, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे परवाने व प्रमाणपत्रांची पडताळणी तसेच मालमत्ता करासह विविध विभागांमध्ये उघए तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समावेश आहे. अमरावती महानगरपालिकेची ही कामगिरी राज्यातील तंत्रज्ञानाधारित व उत्तरदायी शहरी प्रशासनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात असून, भविष्यातील स्मार्ट प्रशासनासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

## फॅट लॉस की वेट लॉस? फिटनेसकडे पाहण्याचा योग्य दृष्टिकोन

आजकाल फिटनेसबद्दल लोकांमध्ये जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. अनेकजण आरोग्य सुधारण्यासाठी, चांगले दिसण्यासाठी किंवा स्वतःचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी जिममध्ये जाण्याचा निर्णय घेतात. एखाद्याला वजन कमी करायचे असते, कोणाला शरीर सडपातळ करायचे असते, तर काहीजण मसल्स वाढवण्यासाठी किंवा एखाद्या खेळात चांगली कामगिरी करण्यासाठी जिमची वाट धरतात.

माझ्या निरीक्षणानुसार, जिममध्ये येणाऱ्या सदस्यांपैकी सर्वात जास्त लोक ‍वेट लॉस‍ या उद्देशाने जिममध्ये प्रवेश घेतात. वजन काट्यावर दिसणारा आकडा कमी करणे हेच त्यांचे मुख्य लक्ष्य असते. मात्र इथेच एक महत्त्वाचा गैरसमज दिसून येतो — फॅट लॉस आणि वेट लॉस या दोन संकल्पना अनेक लोक एकाच अर्थाने वापरतात. प्रत्यक्षात या दोन्ही गोष्टी ऐकायला सारख्या वाटल्या तरी त्यामध्ये खूप मोठा फरक आहे.

वेट लॉस म्हणजे शरीराचे एकूण वजन कमी होणे. यामध्ये शरीरातील पाणी, स्नायू (मसल्स) आणि चरबी (फॅट) या तिन्ही गोष्टींची घट होऊ शकते. त्यामुळे वजन काट्यावर आकडा कमी दिसला तरी तो नेहमीच आरोग्यदायी बदल दर्शवत नाही.

अनेक वेळा वेट लॉस तात्पुरता असतो. वजन काट्यावर काही दिवसांसाठी कमी आकडा दिसतो, पण त्याचे दीर्घकालीन परिणाम शरीरावर चुकीचे होऊ शकतात — जसे की हार्मोन्सचे असंतुलन, चुकीचा पोश्चर, कमी ऊर्जा आणि स्नायूंचे नुकसान.

यामध्ये आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे वजन काट्यावर अवलंबून राहणे. फिटनेसची प्रगती मोजण्यासाठी केवळ वजन काटा पुरेसा नाही. अनेक वेळा वजन तसेच राहते, पण शरीरातील चरबी कमी होऊन शरीर अधिक टोनड दिसते. कपड्यांचा फिट, आरशात दिसणारे बदल आणि शरीराची ताकद व स्टॅमिना हे देखील प्रगतीचे महत्त्वाचे संकेत आहेत.

आजकाल लोकांना जलद परिणाम हवे असतात. त्यामुळे तासन तास जिममध्ये व्यायाम करणे, खूप कमी खाणे, इंटरनेट किंवा सोशल मीडियावर दिसणारे पॅटर्न अंधपणे फॉलो करणे, किंवा कमी वेळात बदल दिसण्यासाठी क्रॅश डायट्स वापरणे अशा चुकीच्या पद्धती वापरल्या जातात. या पद्धतींमुळे काही काळासाठी वजन कमी झाल्यासारखे वाटते, पण त्या दीर्घकाळ टिकत नाहीत आणि आरोग्यावर विपरीत परिणाम करतात.

त्याउलट फॅट लॉस म्हणजे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करणे. यात शरीरातील स्नायू टिकवून ठेवले जातात आणि शरीर अधिक मजबूत व निरोगी बनते.

यामध्ये एक चांगला जिम आणि प्रोफेशनल ट्रेनर यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. योग्य मार्गदर्शन करणारा ट्रेनर प्रत्येक व्यक्तीच्या शरीररचनेनुसार, वय, जीवनशैली आणि उद्दिष्ट लक्षात घेऊन योग्य वर्कआउट आणि आहाराची दिशा देतो. त्यामुळे चुकीच्या पद्धती टाळून सुरक्षित आणि परिणामकारक फॅट लॉस साध्य करता येतो.

तसेच, एक चांगले जिम वातावरण व्यक्तीला सातत्य ठेवण्यासाठी प्रेरित करते. योग्य उपकरणे, स्वच्छता आणि सकारात्मक वातावरण यामुळे फिटनेसचा प्रवास अधिक सोपा आणि आनंददायी होतो. म्हणूनच फिटनेसच्या दृष्टीने पाहिले तर फक्त वजन कमी करणे हा उद्देश नसून शरीरातील अनावश्यक चरबी कमी करून निरोगी, मजबूत आणि संतुलित शरीर तयार करणे अधिक महत्त्वाचे आहे.

शेवटी, फिटनेस ही स्पर्धा नसून एक प्रवास आहे. इतरांशी तुलना करण्यापेक्षा स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

‘वजन कमी करणे हा उद्देश नसून, निरोगी आणि सक्षम शरीर तयार करणे हाच खरा फिटनेस आहे.’



**गणेश अंभोरे, द फिटनेस हब**
**(फिटनेस प्रोफेशनल अँड न्यूट्रीशनिस्ट)**

## कॅफे ब्रेव अँड बड्डी वर दामिनी पथकाची कारवाई

### असभ्यवर्तन करणाऱ्या, युवक युवतींना ताब्यात

प्रतिनिधी २९ मार्च

**अमरावती :** राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील कॅफे ब्रेव अँड बड्डी वर कारवाई करून कॅफेमध्ये असभ्य वर्तन करताना आढळून आलेल्या ६ युवक - युतींवर दामिनी पथकाने कारवाई करून कॅफेच्या मालकाला ताब्यात घेतले आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्तालय अमरावती शहर हद्दीत भरोसा सेल पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे, म.पो.कॉ.पुजा सपकाळ, यांनी पोलीस सेशन राजापेठ, कोतवाली अमरावती येथील दामिनी पथकातील म.पो.कॉ. भाग्यश्री पवार, पुनम गायकवाड, कल्पना तोट यांना पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या माहिती वरुन पो. से राजापेठ हद्दीतील डिष्ट जवळ असणाऱ्या कॅफे ब्रेव अॅण्ड बड्डी या ठिकाणी असभ्यतेचे वर्तन करित असतांना मिळुन आलेल्या ०६ युवक, युवतींवर महाराष्ट्र पोलीस प्रतिबंधक अधिनियम अन्वये कार्यवाही करुन पालकांच्या सपुर्द करण्यात आले. कॅफे चालक नयन बंडोपत बागेकर वय ३० वर्षे, अंकुश गजानन दवंडे वय ३० वर्षे दोन्ही रा. गोपाल नगर, अमरावती




यांचेवर सुध्दा म.पो. प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत कार्यवाही करण्यात आली. पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रातील महिलांना व विद्यार्थीना तसेच बालकांना कुठल्याही प्रकारे छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर त्रास होत असल्यास निर्भय होवुन हेल्पलाईन क्रमाकः ११२, १०९१,१०९८ यावर पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येते. छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर गैरप्रकार आढळुन आल्यास सबंधितांवर कायदेशिर कठोर कार्यवाही करण्यात येईल असे पोलिसांनी म्हटले आहे.

## श्री खाटू श्याम बाबा यांच्या मंदिरात जाऊन आ. रवी राणा व माजी खा. नवनीत राणा यांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी २९ मार्च

**अमरावती :** श्री.खाटू श्याम बाबा यांच्या चरणी नतमस्तक होवुन व आशीर्वाद घेवुन राज्यातील शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदो व त्यांच्या सर्व अडचणी व दुःख दूर होवोत, अशी केली प्रार्थना तसेच समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रगतीसाठी आणि सर्वांच्या



जीवनात आनंद, समाधान व भरभराट लाभावी तसेच सर्वांच्या ईच्छा पुर्ण होण्याकरिता श्री.खाटू श्याम बाबा यांच्या चरणी केली प्रार्थना आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांनी केली.

# वसुधाताईंचे कार्य आजच्या तरुण पिढीसाठी दीपस्तंभासारखे- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांना 'जीवनगौरव' पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी २९ मार्च

**अमरावती:** माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीत केवळ सत्ताकारण न करता समाजकारणाचा वारसा खऱ्या अर्थाने जपला आहे. त्यांनी महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या कार्य कर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे कार्य आणि अनुभव आजच्या तरुण पिढीसाठी एका दीपस्तंभासारखा प्रेरणादायी आहे, असे गौरवपूर्ण उद्गार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल वसुधाताई देशमुख यांना श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित सोहळ्यात 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले, त्यावेळी पालकमंत्री बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखेडे, आमदार जयंत पाटील, सुलभा खोडके, संजय खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी मंत्री अनिल देशमुख, विलास इंगोले यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, ग्रामीण भागाचा विकास आणि महिला सक्षमीकरण हे वसुधाताईंच्या कार्याचे मुख्य केंद्रबिंदू राहिले असून हा पुरस्कार त्यांच्या तपोनिष्ठ सेवेची समाजाने घेतलेली दखल आहे. ताईंच्या प्रेरणेमुळे आज विदर्भातील महिलाआत्मनिर्भर होऊन काम करीत आहेत. वसुधाताईंचे कर्तव्यदक्ष , दिशा देणारे विचार, उत्तम वैचारिक भूमिका इतरांसाठी आदर्श व प्रेरणादायी आहे. त्यांची विदर्भाच्या प्रश्नाबाबतची जाण सखोल आहे. ते समजून घेण्यासाठी लवकरच मी त्यांची भेट घेऊन त्यांचे विचार जाणून घेणार आहे व पालकमंत्री म्हणून त्या विषयावर कार्य करणार आहे. विदर्भाचे विकासासाठी वसुधाताई आयुष्यभर झटल्यात. वसुधाताईंनी विदर्भाच्या विकासासाठी रचलेल्या पायाचा कळस पूर्ण करण्याचे कार्य मी पूर्ण करेल. त्यांचे अमरावतीच्या विकासासाठी अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प करतो. विदर्भाच्या विकासासाठी त्यांची तळमळ वाया जाणार नाही.

तो विकास पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे पालकमंत्री श्री. बावनकुळे यावेळी म्हणाले. पुरस्काराला उत्तर देताना वसुधाताई देशमुख म्हणाल्या, हा 'जीवनगौरव' पुरस्कार म्हणजे केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून, गेल्या अनेक दशकांपासून माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या सामान्य जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा सन्मान आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सार्वजनिक जीवनात काम करताना समाजाचे ऋण फेडणे हेच आपले मुख्य ध्येय असल्याचे सांगून त्या म्हणाल्या की, राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार आले, परंतु सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवताना मिळणारे समाधान सर्वात मोठे होते. हा प्रवास कठीण होता, पण लोकांच्या प्रेमामुळे तो सुखकर झाला. माझ्या कामावर विश्वास ठेवून मला सदैव सहकार्य करणारे, माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या माझ्या जनतेचा हा पुरस्कार आहे . शेवटच्या श्वासापर्यंत जनसेवेचे हे व्रत आपण अखंडपणे सुरू ठेवणार असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. या सोहळ्यात अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यातील दहयांद्री गावातील 'रुक्मिणी' या मुलींच्या नवीन वसतीगृह इमारतीचे मान्यवरांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. तसेच प्रा. नवनीत देशमुख लिखित वसुधाताईंच्या जीवनप्रवासावर आधारित 'वसुधा' या कादंबरीचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

## अकोला पोलिसांची डिजिटल झेप




डिजिटल सेवांचा वापर वाढवून प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठी शासनाकडून सातत्याने नवनव्या उपक्रमांची अंमलबजावणी होते. ठ१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमठ या विशेष मोहिमेतही हा महत्वाचा निकष होता. या मोहिमेत अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाला राज्यात 'ई-गव्हर्नन्स' मध्ये तृतीय क्रमांक मिळाला आहे.

अकोला जिल्हा पोलीस दलाने डिजिटल सेवांचा प्रभावी वापर करून प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता आणल्याने हा बहुमान मिळाला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचा मुंबई येथे गौरव करण्यात आला.

या मोहिमेत संकेतस्थळाची उभारणी, 'आपले सरकार' प्रणालीची अंमलबजावणी, ई-ऑफिसचा वापर, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुविधा यासह कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर हे निकष होते. या सर्व निकषांची अंमलबजावणी करून अकोला जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाने डिजिटल प्रशासनाची दिशा अधिक ठळक केली आहे.

जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा मिळत आहेत. 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' आणि 'प्रोजेक्ट रक्षा' असे त्यात प्रमुख उपक्रम आहेत. 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' हा एआय आधारित प्रकल्प असून, गुन्हे घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात. त्यामुळे 'बॉडी क्राईम' प्रकारातील गुन्ह्यांमध्ये तब्बल ६४ टक्के घट झाली आहे.

तसेच, 'प्रोजेक्ट रक्षा' या नागरिक प्रतिसाद प्रणालीद्वारे पोलीस सेवांची गुणवत्ता तपासून आवश्यक सुधारणा करण्यात येतात. यामुळे जिल्ह्याचा नागरिक विश्वास निर्देशांक १० पैकी ८.९ इतका उत्कृष्ट नोंदवला गेला असून, सार्वजनिक सुरक्षिततेची भावना वाढल्याचे ते द्योतक आहे.

गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अकोला पोलीस दलाने 'ऑपरेशन प्रहार' राबवून ८.२१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय, 'मिशन उडाण' अंतर्गत १८०० हून अधिक शाळांमध्ये अंमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे.

एकूणच, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या जोरावर अकोला पोलीस दलाने गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याबरोबरच, नागरिकांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यातही यश मिळवले आहे. त्यामुळे ई-गव्हर्नन्स उपक्रमात त्याची ठळक नोंद घेतली गेली आहे.

- **हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

## हातात चाकू घेऊन फिरणारा आरोपी अटकेत




**अमरावती :** हातात चाकू घेऊन दहशत पसरणारा आरोपीला गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. आज दि २८/०३/२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक पो स्टे नागपुरी गेट हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना इसम नामें शेख जमीर शेख जमील, वय २२ वर्ष ,रा पठाणपुरा अमरावती हा हातात चाकू घेऊन नागपुरी गेट नाका चौक येथे सार्वजनिक ठिकाणी दहशत करीत असताना मिळून आला त्याला त्याब्यात घेऊन त्याच्याकडून १ चाकू कि अ १००० रु माल जप्त करून पो स्टे नागपुरीगेट येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सहकलम १३५ बी पि अक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे . पुढील तपास गुन्हे शाखेचे पथक करीत आहे.

## विपश्यना केंद्र, सांस्कृतिक भवनाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**अमरावती :** मार्डी रोडवरील विपश्यना केंद्र आणि सांस्कृतिक भवनाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी सांस्कृतिक भवनाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केले. लोकार्पण कार्यक्रमाला खासदार अनिल बोंडे, बळवंत वानखेडे, नगरसेविका सुरेखा लुंगारे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला श्री. बावनकुळे यांनी बुद्ध वंदेनेत सहभाग घेतला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन आणि विपश्यना केंद्राची पाहणी केली. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी समाजाच्या सर्वात शेवटच्या घटकाचा विकास करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. ५

## चित्रा कॉलनीत देह व्यवसाय करणाऱ्या दोन महिला व एका ग्राहकाला पोलिसांनी घेतले ताब्यात

### दामिनी व भरोसा सेल महिला पोलीस पथकाची कारवाई

प्रतिनिधी २९ मार्च

**अमरावती:** मंगलधाम मार्गावरील मोठ्या पुलानाजीक असलेल्या चित्रा कॉलनीत देह व्यवसाय करणारे एका महिलेच्या घरातून पोलिसांनी दोन महिला व एका ग्राहकाला ताब्यात घेतले आहे. ही कारवाई शुक्रवारी रात्री दामिनी पथक व भरोसा सेल महिला पोलिसांचे पथकाने केली आहे. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्तालय अमरावती शहर हद्दीत पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भरोसा सेलच्या मेघाली गावंडे, महिला पोलीस पुजा सपकाळ यांनी दामिनी पथकासह पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या माहिती वरुन पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अम. शहर हद्दीत मंगलधाम रोडवर पुला जवळ, चित्रा कॉलनी अमरावती येथे



एक स्त्री घरात स्वताःचे आर्थिक फायदया करिता स्त्रीयां पुरवुण त्यांचेकडुन देह व्यापार करुन घेते अशी खबर मिळाल्याने सदर खबरेची माहिती सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा अमरावती शहर यांना देवुन सदर ठिकाणाची शहानिशा करुन रेड करणे कामी पोलीस स्टाफ, पंच, फंटर बोगस ग्राहक सह रवाना झाले.

सदर ठिकाणी जावुन खबरे प्रमाणे शाहनिशा करुन रेड केला असता, एक स्त्री घरात स्वताःचे आर्थिक फायदया करिता स्त्रीयां पुरवून त्यांचेकडुन देह व्यापार करुन घेत असतांना मिळुन आली व तिच्या सोबत ग्राहक आणनारा एक पुरुष मिळुन आला. पिडित २ महिल्या मिळुन आल्या पिडितांनी सांगीतले की, वेश्याव्यवसाय करण्या करिता येथे बोलवतात. वरुन सदर ठिकाणाहुन एकुण २७४५०- रुपयाचा माल पंचा समक्ष जप्त करण्यात आला. नमुद आरोपी विरुध्द कायदेशिर कार्यवाहिस होणेस कलम ३,४,५ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यास फिर्याद देण्यात आली.

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रातील महिलांना व विद्यार्थीना तसेच बालकांना कुठल्याही प्रकारे छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर त्रास होत असल्यास निर्भय होवुन हेल्पलाईन क्रमाकः ११२, १०९९,१०९८ यावर पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येते. छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर गैरप्रकार आढळुन आल्यास सबंधितांवर कायदेशिर कठोर कार्यवाही करण्यात येईल. असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. २९ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# भगवान महावीर जयंती महोत्सवाचे आयोजन

**अकोला :** सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रम्हचर्य, अपरिग्रह या महान तत्वाचा उपदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तिर्थंकर भ. महावीर यांचा जयंती महोत्सव संपूर्ण भारतात चैत्र शु.१३ सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे. या जयंती महोत्सवाचे आयोजन स्थानिक सैतवाळ दि. जैन मंदिर किल्ल्याजवळ करण्यात येत आहे. त्यानिमित्त खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन कार्यकारीणीद्वारा करण्यात आले आहे. प्रात: ७.३० वाजता गांधी जवाहर बागेत असलेल्या महावीर स्तंभाचे पुजन करण्यात येईल. व तेथे सैतवाळ सेवासंघ द्वारा प्रभावना वितरीत होईल. तद्नंतर सैतवाळ दि. जैन मंदिरात सकाळी ९ वाजता भगवान महावीरांचे जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


## तीर्थक्षेत्रांचे महत्व महान- हभप राजेंद्र महाराज वकटे



**अकोला:** आपल्या परंपरेत व धार्मिक अनुष्ठानात तिर्थक्षेत्रांना मोठे महत्व आहे. काही ठिकाणी केवळ तीर्थ असते तर क्षेत्र नसते, काही ठिकाणी क्षेत्र असते तर तीर्थ नसते. मात्र यात जे तीर्थ आहे व क्षेत्र पण आहे.अश्या पावन तीर्थक्षेत्री जाणे गरजेचे असून वर्षातून एकदा अश्या तीर्थक्षेत्रात गेल्यावर जीवनाचे सार्थक होत असल्याचा हितोपदेश हभप राजेंद्र महाराज वकटे यांनी केला. दाबकी रोडच्या कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंदिर परिसरात सुरू असलेल्या संगीतमय शिवपुराण कथेत पाळोदी येथील कथाकार हभप राजेंद्र महाराज वकटे यांनी केला. ते म्हणाले, काही ठिकाणी नदी तीर्थ आहे, तर कोठे सरोवर तीर्थ आहे. काही ठिकाणी समुद्र तीर्थ आहे, कोठे विहीर तीर्थ आहे, तर कोठे तलाव तीर्थ आहे. समुद्राला सर्व तीर्थे मिळतात म्हणून अशा समुद्रात स्नान करणे म्हणजे तीर्थाचे फळ प्राप्त करणे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.आपल्या शिव कथेत त्यांनी मनुष्याच्या वर्णाचा उहापोह केला. ते म्हणाले, मरेपर्यंत जे मनातील जात नाही त्याला जात म्हणतात.या जातीव्यवस्थेचा संतांनी छेद करून समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असुन संत परंपरेत जातीव्यवस्थेला कोणताही थारा नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले मनुष्य आपल्या कर्माने श्रेष्ठ होतो तो वर्णाने होत नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## निधन वार्ता

### गणेशराव देशमुख



**शेगांव:** शहरातील वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष गणेशराव शंकरराव देशमुख यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे मोठा आप्तपरिवार आहे. पत्रकार प्रशांत देशमुख यांचे ते वडील होत.

# हा हलगर्जीपणा कोणाचा? अजूनही लोंबलेली तार जशीच्या तशी

प्रतिनिधी २९ मार्च

### तरुणाचा झाला होता दुर्देवी मृत्यू

**हिवरखेड :** येथील होतकरू तरुण ज्ञानेश्वर गोमासे हा श्री राम ब्रीजवर आयशरवर ताडपत्री लावत असताना त्याचा हायटेन्शन विद्युत लाईनला स्पर्श होऊन जागीच मृत्यू झाला होता.

या तरुणाच्या कुटुंबाला आर्थिक मदत व्हावी याकरिता या ठिकाणी मोठा जनसमुदाय उसळला होता, पुन्हा या ठिकाणी अशी दुर्देवी घटना कोणाशीस घडु नये याकरिता सबंधितानी तत्काळ काही उपाय योजना आखयाला पाहिजे होती, परंतु या ठिकाणी अजूनही तेच तार लॉबलेले असून कोणीच पुढाकार घेऊन या तारांची दिशा बदली नाही. संतापलेल्या नागरिकांना प्रश्नन पडला हा हलगर्जीपणा कोणाचा, या तोल काट्याचे मालक किंवा महावितरण कंपनी कोणीही तत्परता दाखवत नाही.



मी स्वतः महावितरण कंपनी हिवरखेड कार्यालयात एक नाही तर तीन अर्ज दिले , येथील विद्युत तारा स्थलांतर करण्यासाठी परंतु अद्यापही या ठिकाणी महावितरण अजुनही कुठीलच सकाराआत्मक भूमिका साकारली नाही अजून एक अर्ज देतो

**रमेश गुप्ता,**
श्रीराम वे ब्रीजचे संचालक

आम्हाला अजूनही या बाबत अर्जाद्वारे मागणी केली नाही. या ठिकाणी माती टाकण्यात आल्याने हाईट वाढली. आमच्या विद्युत तारा व्यवस्थित आहेत.

**आशिष धांडे,**
सहाय्यक अभियंता महावितरण
हिवरखेड

# पातूर येथे संत श्री सिदाजी महाराज यात्रा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २९ मार्च

**पातूर:** शहराचे आराध्य दैवत संत श्री सिदाजी महाराज यांचा वार्षिक यात्रा महोत्सव दिनांक २८ मार्च रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाला. या यात्रेमध्ये पंचक्रोशीतून हजारो भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावर्षी यात्रेसाठी सुमारे ६० क्विंटल गव्हाचा आटा महाप्रसादासाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. मागील वर्षांच्या तुलनेत यंदा भाविकांची संख्या दुप्पट असल्याचे दिसून आले, त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



यात्रेनिमित्त बाळापूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार नितीन देशमुख यांनी संत श्री सिदाजी महाराजांचे दर्शन घेतले व महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी सिदाजी महाराज पंचमंडळाच्या वतीने आमदार देशमुख यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. यात्रेच्या यशस्वी आयोजनामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण असून पातूर शहरात धार्मिक उत्साह ओसंडून वाहत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलनचे सदस्य जोडो अभियान



प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी सम्मेलनाची अकोला शाखेची सभा खंडेलवाल भवनात झाली.

या कार्यक्रमात प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता, जिल्हाध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, शहर अध्यक्ष एड. सुरेश अग्रवाल, महामंत्री श्याम शर्मा, प्रांतीय प्रचार मंत्री संतोष छाजेड, राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल व महामंत्री संजय खंडेलवाल उपस्थित होते.यावेळी सम्मेलन मधील सर्व आजीवन सदस्यांचा सत्कार करण्यात येऊन त्यांना प्रमाणपत्रे प्रदान केली गेली.

यात सिद्धार्थ रूहाटिया, ब्रिजमोहन चितलांगे, सुरेश अग्रवाल, शैलेन्द्र काग़लीवाल, श्यामसुंदर खंडेलवाल, दिलीप खत्री, कमलकिशोर अग्रवाल, सुनील वर्मा, बजरंगलाल अग्रवाल, अभिषेक सोनालावाला, हरीश खंडेलवाल, सतीश गोयनका, नीलेश मेहता, मनोज अग्रवाल ,नरेश अग्रवाल, नीलेश बोर्डीवाल, श्रीकांत गोयनका, संतोष छाजेड, राजकुमार शर्मा, रोहित केडिया, संजय अग्रवाल, सुनील बाजोरिया, सुमित मुरारका, मनोज चांडक, आशीष बाहेती यांचा समावेश होता.

यावेळी महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी सम्मेलनाला अधिक सशक्त आणि व्यापक बनविण्याच्या उद्देशाने सदस्य जोडो अभियान विधिवत सुरू करण्यात आले. या अभियानात नव्या सदस्यांना जोडण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी आपल्या मनोगतात अ. भा. मारवाडी संमेलनाच्या ऐतिहासिक योगदानावर प्रकाश टाकला. यावेळी अश्विन कटारिया, श्याम शर्मा, जयप्रकाश चांडक, कुंजीलाल सुनारीवाल, योगेश तिवारी, अनिल पाडिया, ज्ञानप्रकाश खंडेलवाल, दीपक गोयनका, मनोज खंडेलवाल, संजय खंडेलवाल, प्रदीप रांदड, शैलेन्द्र अग्रवाल आणि भीवराज जैन यांच्यासह अनेक मान्यवरांनी सदस्यत्व ग्रहण केले. संचालन संतोष छाजेड यांनी तर आभार प्रदर्शन श्याम शर्मा यांनी केले.

# समाधान शिबिर ठरले असमाधान शिबिर

प्रतिनिधी २९ मार्च

### आमदार सावरकरांनी व्यक्त केली नाराजी

**कुटासा:** तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा-१)’ अंतर्गत चोहोट्टा बाजार येथे आयोजित शिबिरात नागरिकांच्या तक्रारींचा पूर आल्याने वातावरण तापले. अपेक्षित तोडगा न निघाल्याने हे शिबिर ‘समाधान’ऐवजी ‘असमाधान शिबिर’ ठरत असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

या शिबिराचा उद्देश महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी उपलब्ध करून देणे, तक्रारींचे तात्काळ निवारण करणे



आणि डिजिटल सेवांचा वापर वाढवणे हा होता. डिजिटल ७/१२, ८-अ उतारे, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, रहिवासी व जात प्रमाणपत्र, अकृषिक (ँ) परवानगी यांसारख्या सेवा एकाच ठिकाणी देण्याचे नियोजन करण्यात आले होते.मात्र प्रत्यक्षात अनेक नागरिकांची प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ मधील त्रुटी, तसेच विविध प्रमाणपत्रांची कामे मार्गी न लागल्याने शिबिरात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. त्यातच बऱ्याच विभागांतील अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला दांडी मारल्याने नागरिकांची गैरसोय अधिकच वाढली.यावेळी आमदार सावरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. ङ्कमाझ्या मतदारसंघात काम करायचे नसेल, तर बदलीचे अर्ज करून घ्या,ङ्ग असा स्पष्ट इशारा देत त्यांनी अनुपस्थित आणि निष्क्रिय अधिकाऱ्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

नागरिकांनीही आपली व्यथा मांडताना, ‘शिबिरात सेवा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्षात योग्य मार्गदर्शन मिळत नाही. अनेक विभागांचे अधिकारीच नसल्याने कामे अडकून पडतात,’ अशी तक्रार केली.

# खंडेलवाल भवनात झाले हिंदू संमेलन

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** स्थानिक खंडेलवाल भवन येथे शनिवारी हिन्दू सम्मेलन पार पडले. समाज प्रबोधन, समाज सगंठन आणि समाज उत्थान या गोष्टी काळाची गरज आहे हे ओळखून शहरात विविध ठिकाणी असे आयोजन करण्यात येत आहेत. खंडेलवाल भवन येथे प्रा. अनुप गोवर्धन शर्मा यांचा अध्यक्षते खाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात



मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन आणि भारतमाता प्रतिमा तथा प्रभु श्रीराम च्या मुर्ती ला माल्यार्पण करून करण्यात आले. या कार्यक्रमात आशीर्वचन करीता नित्यानंदजी स्वामी, ओरई, उ. प्र. तर प्रमुख वक्ता अंबरीश पुंडलिक होते. भारतभर वीररस कवियत्री म्हणून ख्यातनाम श्रध्दजी शौर्य यांनी आपल्या वीररस कवितेने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रम ची सुरुवात सौ. श्रध्दा मोकाशी यांच्या द्वारे महामृत्युंजय यज्ञांने ने करून हिंदू सम्मेलन शुरू करण्यात आले. संयोजक संतोष वाधवानी तर प्रदीप गोयनका यांनी सहकार्य केले. संचालन डॉ. मेघना गांधी आणि सौ. कांचन नावंधर यानी कले. आभार प्रदर्शन नुतन जैन यांनी केले. या कार्यक्रमात आ. वसंत बाबू खंडेलवाल, गोपालजी खंडेलवाल, नगरसेवक हरीश आलीमचंदानी, उषा वीरक, संतोष डोंगरे, सौ. कल्पना गोटफोडे आणि आळशी प्लॉट येथील बहुसंख्य महिला आणि पुरुष उपस्थित होते.

# सामाजिक न्याय योजनांचे छायाचित्र प्रदर्शन

### विविध योजनांची सचित्र माहिती



प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** जिल्हा माहिती कार्यालयातर्फे सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाच्या सहकार्याने सामाजिक न्याय योजनांचे प्रदर्शन उपविभागीय कार्यालय (तहसील) येथे घेण्यात आले. त्याला विविध क्षेत्रातील मान्यवर, अभ्यागत, महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आदींचा चांगला प्रतिसाद मिळाला.

शासनाकडून अनुसूचित जातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची नागरिकांना थेट माहिती व मार्गदर्शन मिळत असल्याने प्रदर्शन उपयुक्त असल्याची प्रतिक्रिया विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी व्यक्त केली. छायाचित्र प्रदर्शनामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती छायाचित्रे, माहिती फलक व दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात आली. अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांसाठी शिक्षण, स्वयंरोजगार, निवास व आर्थिक सहाय्य योजनांविषयी मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात आले.

# मशीदी समोर कथित आक्षेपार्ह इशाऱ्याचा व्हिडिओ व्हायरल

### आमदार संग्राम जगताप यांच्यावर कारवाईची जावेद जकारिया यांची प्रशासनाकडे तक्रार

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** अहमदनगर (अहिल्यानगर) येथे रामनवमीच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणात अकोल्यातील सामाजिक कार्यकर्ते जावेद जकरिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे आमदार संग्राम जगताप यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करत प्रशासनाकडे तक्रार पाठवली आहे.

जावेद जकरिया यांनी रामदासपेठ पोलीस स्टेशन, अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना ई-मेलद्वारे पाठवलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, व्हायरल व्हिडिओमध्ये आमदार संग्राम जगताप हे कथितपणे एका मशीदेसमोर नाचत-गाताना तसेच



मशिदीकडे बाण सोडण्यासारखे इशारे करताना दिसत आहेत. त्यांच्या मते अशा प्रकारच्या कृत्यामुळे समाजात धार्मिक तणाव आणि वैमनस्य निर्माण होण्याची शक्यता आहे.

जकरिया यांनी सांगितले की महाराष्ट्रात सर्व धर्मांचा सन्मान आणि सामाजिक सौहार्दाची परंपरा आहे. अशा परिस्थितीत एखाद्या लोकप्रतिनिधीकडून अशा प्रकारचे वर्तन होणे हा गंभीर विषय असून प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी.

तसेच यापूर्वी दिवाळीच्या काळात आमदार संग्राम जगताप यांनी ङ्घफक्त हिंदू व्यापाऱ्यांकडूनच खरेदी कराङ्ग अशी घोषणा केल्याच्या प्रकरणात जावेद जकरिया यांनी अकोला न्यायालयात याचिका दाखल केली होती, जी सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २ एप्रिल २०२६ रोजी होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

जकरिया यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे की, या प्रकरणात भारतीय दंड संहिता कलम 153A, 295A आणि ५०५(२) अंतर्गत कारवाई होऊ शकते. कारण या कलमांमध्ये धर्माच्या आधारावर वैमनस्य पसरवणे, धार्मिक भावना दुखावणे आणि विविध समुदायांमध्ये द्वेष निर्माण करणे यासंबंधी तरतुदी आहेत. समाजात शांतता आणि सौहार्द टिकून राहावे यासाठी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर चौकशी करून योग्य कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जकरिया यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# ‘आधार’ व ‘आपले सरकार’ सेवा केंद्रांची जिल्हास्तरीय विशेष तपासणी मोहीम

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला :** जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ‘आपले सरकार’, महासेतू तसेच आधार सेवा केंद्रांची व्यापक तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या आदेशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात येत असून, मंडळ अधिकारी स्तरावर डिजिटल माध्यमातून काटेकोर तपासणी केली जात आहे.

नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक पारदर्शक, जलद आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने अकोला जिल्हा प्रशासनाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सेवा केंद्रांची सखोल पडताळणी सुरू आहे.

या मोहिमेत मंडळ अधिकारी डिजिटल पद्धतीने स्विफ्ट अकोला प्रणालीच्या (swiftakola.in) माध्यमातून केंद्रांची तपासणी करत आहेत. सेवा केंद्रांमधील



कामकाज, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता, प्रलंबित अर्जांची स्थिती, तसेच आवश्यक कागदपत्रांची अचूकता याची बारकाईने पाहणी करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे नागरिकांचा थेट सहभाग. आता जिल्ह्यातील नागरिकांना कोणत्याही ‘आपले सरकार’ किंवा आधार सेवा केंद्राबाबत तक्रार किंवा अभिप्राय नोंदविण्याची सुविधा स्विफ्ट अकोला या संकेतस्थळावर (swiftakola.in) उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासोबतच, नागरिकांना थेट संपर्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी ०८०६५९०९८४४ हा दूरध्वनी क्रमांकही उपलब्ध करून दिला आहे.

या उपक्रमामुळे सेवा वितरणात अधिक पारदर्शकता येण्यास, गैरप्रकारांना आळा बसण्यास आणि नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित दखल घेण्यास मदत होणार आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे सेवा केंद्रांच्या कामकाजात शिस्त निर्माण होऊन नागरिकांना वेळेवर व गुणवत्तापूर्ण सेवा मिळण्यास मोठी चालना मिळणार आहे. जिल्हा प्रशासनाने भविष्यातही अशा प्रकारच्या डिजिटल तपासण्या सातत्याने सुरू ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २९ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# गव्हाला भरघोस उतारा, पण बाजारभावात 'दणका'

## शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी; हमीभावापेक्षा कमी दराने विक्री



प्रतिनिधी २९ मार्च

**यवतमाळ** : यंदा पुरेशी थंडी आणि पोषक हवामानामुळे रब्बी हंगामातील गव्हाचे पीक उत्तम आले आहे. शेतकऱ्यांना एकरी १५ ते २० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळत असल्याने चेहऱ्यावर समाधान आहे. पण दुसऱ्या बाजूला बाजारपेठेत गव्हाच्या दरात मोठी घसरण झाल्याने ही खुशी क्षणभंगुर ठरली आहे. उत्पादन खर्च निघेल की नाही, याची चिंता गहू उत्पादक शेतकऱ्यांना सतावत आहे.

आखाती देशांतील युद्धपरिस्थिती, जागतिक पुरवठा आणि भरपूर उत्पादन यामुळे शेतमालाच्या दरांवर दबाव आला आहे. केळी, टरबूज, कांदा, द्राक्षांसह गव्हालाही या घसरणीचा मोठा फटका बसला आहे.

कृषी मूल्य आयोगाने २०२५-२६ रब्बी हंगामासाठी गव्हाचा हमीभाव (एमएसपी) २,४२५ रुपये प्रति क्विंटल निश्चित केला होता. मात्र, प्रत्यक्ष बाजारात गव्हाला केवळ २,१०० ते २,२०० रुपये किंवा काही ठिकाणी त्याहूनही कमी दर मिळत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या वर्षी ३,००० ते ३,५०० रुपयांपर्यंत भाव मिळालेल्या गव्हाला यंदा अवघ्या २,०००-२,२०० रुपयांच्या आसपास दराने विक्री करावी लागत आहे.

महाराष्ट्रात गव्हाचे लागवड क्षेत्र सुमारे १५ लाख हेक्टरच्या आसपास आहे. तरीही हमीभाव खरेदीसाठी प्रभावी यंत्रणा नाही. पंजाब-हरियाणात एफसीआयमार्फत हमीभावाने खरेदी होते, पण महाराष्ट्रात शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. नाफेडकडूनही ठोस खरेदी केंद्रे उभी राहिलेली नाहीत.

उत्पादनासोबतच खर्च वाढला आहे, पण भाव घसरल्याने नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे.

> ■ "राज्य शासनाने तातडीने गहू खरेदी केंद्र सुरू करावीत किंवा बाजारभाव व हमीभावातील सुमारे ४००-६०० रुपयांचा फरक 'भावांतर योजना'द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा. केंद्र व राज्य सरकारने याबाबत तातडीने पावले उचलावीत, अन्यथा शेतकऱ्यांची स्थिती आणखी बिकट होईल." शेतकऱ्यांचा मुख्य मागणी आहे की, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि बाजारातील घसरण रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. अन्यथा, रब्बी हंगामातील चांगल्या उत्पादनाचा फायदा शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांना होण्याची शक्यता आहे.
> - शेतकरी नेते मनीष जाधव (स्वाभिमानी शेतकरी संघटना)

### एकरी गहू उत्पादन खर्च

नांगरणी : १,५०० रुपये
पेरणी यंत्र : ८०० रुपये
बियाणे (१ बॅग) : २,२०० रुपये
डीएपी खत : १,३५० रुपये
तणनाशक : ३०० रुपये
युरिया (२ बॅग) : ५३२ रुपये
मजुरी : ५०० रुपये
फवारणी (बुरशीनाशक/कीटकनाशक) : ७०० रुपये
कापणी-हार्वेस्टिंग : २,००० रुपये
**एकूण : ९,८८२ रुपये**

# ट्रॉली पलटी; महिलेचा मृत्यू, नऊ जखमी

प्रतिनिधी २९ मार्च



**उमरखेड** : उमरखेड तालुक्यातील आडद गावाजवळ मजुरांनी भरलेल्या दोन ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होऊन भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अर्चना रामराव व्यवहारे (वय 25, रा. धनज) या महिलेचा मृत्यू झाला, तर नऊ मजूर जखमी झाले आहेत. शनिवारी (दि. 28 मार्च) सकाळी साडेआकरा ते बारा वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

उमरखेड तालुक्यातील धनज, वेणी, धनसळ, मरसूळ येथील मजूर ऊसतोडीसाठी लातूर येथे गेले होते. हंगाम संपल्यानंतर हे मजूर आपल्या गावी परतत होते. २७ मार्चच्या रात्री वारंगा फाटा येथील बसस्थानकाजवळ मुक्काम घेतल्यानंतर सकाळी सहा वाजता त्यांनी पुन्हा प्रवास सुरू केला. धनज गावापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दोन्ही ट्रॉली पलटी झाल्या.

या अपघातात जखमी झालेल्यांमध्ये अभिषेक शंकर धुर्वे (वय 5), मथुराबाई हळसे, सुनिता माधव गुहाडे, रामराव मारोती व्यवहारे, बालाबाई दौलत भडंगे, सुशीला दत्ता हाळसे, रेखा संतोष धुर्वे, अनिता संतोष ढंगारे, अर्चना रामराव व्यवहारे आणि विलास संतोष ढंगारे यांचा समावेश आहे. सर्व जखमींना तातडीने पुसद उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर अर्चना रामराव व्यवहारे यांना मृत घोषित केले. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय यवतमाळ येथे रेफर करण्यात आले आहे, तर इतरांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, याच प्रकारची दुर्घटना महिनाभरा पूर्वीही घडली होती.

ऊसतोडीवरून परतणाऱ्या गोपवाडी येथील मजुरांच्या अपघातात तीन मजूर व एका चिमुकलीचा मृत्यू झाला होता. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# दिग्रसमध्ये अवैध गॅसचा काळाबाजार उघड

## पोलिसांची कारवाई; १२ सिलेंडरसह ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २९ मार्च



**दिग्रस** : शहरातील ब्रम्हणपुरी परिसरात अवैध गॅस सिलेंडर साठवणुकीवर पोलिसांनी धडक कारवाई करत १२ लहान-मोठे सिलेंडर व इतर साहित्य असा सुमारे ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शनिवारी (दि. २८ मार्च २०२६) दुपारी करण्यात आली.

पोलीस स्टेशन दिग्रस हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिले होते. त्यानुसार सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ.तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ब्रम्हणपुरी येथील राष्ट्रीय महाविद्यालयाजवळ छापा टाकला.

या कारवाईदरम्यान राजू शाम पदमावार या इसमाच्या घरी अवैधरित्या गॅस सिलेंडर साठवणूक केल्याचे आढळून आले. त्याच्याकडून १० मोठे व २ छोटे गॅस सिलेंडर, ४ रेग्युलेटर आणि एक वजन काटा जप्त करण्यात आला. याबाबत कोणतेही वैध कागदपत्र सादर करता न आल्याने सदर साहित्य जप्त करण्यात आले.

सदर प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई पोलीस तसेच तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाकडून सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, दिग्रस पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, शहरात कुठेही अवैध गॅस साठवणूक अथवा जादा दराने विक्री होत असल्यास तात्काळ पोलीस स्टेशन किंवा पुरवठा निरीक्षक कार्यालयास माहिती द्यावी.अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ही कारवाई पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# आठवडी बाजार बंद ठेवण्याचा आदेश

प्रतिनिधी २९ मार्च

**आर्णी** : बहिरमदेव शिव महापुराण सेवा ट्रस्ट, आर्णी यांच्या वतीने ३० मार्च ते ५ एप्रिल २०२६ या कालावधीत पं. प्रदीप मिश्रा (सिहोर वाले) यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आर्णी येथील आठवडी बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मार्केट अँड फेअर अॅक्ट, १८६२ अंतर्गत कलम ५ (अ) नुसार हा आदेश जारी केला आहे. त्या अनुषंगाने, नगरपरिषद आर्णी येथे सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी पार पडणारा आठवडी बाजार बंद राहील. निर्णयामुळे स्थानिक व्यापारी व नागरिकांना किमान एक दिवस बाजार बंद असण्याची अनुकूलता मिळणार आहे.

# उसाचे पैसे रखडले; शेतकऱ्यांचा 'घंटानाद' इशारा

प्रतिनिधी २९ मार्च



**उमरखेड** : उसाच्या थकीत बिलांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत रक्कम न मिळाल्यास ३ एप्रिलपासून कारखान्यासमोर 'घंटानाद' करत बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वसंत सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेड, पोफाळी येथे गाळ्यास गेलेल्या उसाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. यासंदर्भात शिवसेना (शिंदे) सहसंपर्क प्रमुख चितांगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी कारखाना व्यवस्थापनाला निवेदन दिले. १४ जानेवारी ते १८ फेब्रुवारी या कालावधीत गाळ्यास गेलेल्या उसाचे बिल नियमानुसार १४ दिवसांत देणे अपेक्षित असताना ते रखडल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. दैनंदिन खर्च, शेतीकामे तसेच लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर पैशांची निकड भासत आहे.'मार्च एंडिंग'पूर्वी कर्जफेड न झाल्यास वाढीव व्याजाचा भार सहन करावा लागणार असल्याने शेतकरी अधिकच अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे ३१ मार्चपर्यंत थकीत रक्कम अदा करावी, अन्यथा ३ एप्रिलपासून घंटानाद उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.या प्रश्नामुळे परिसरात अस्वस्थता निर्माण झाली असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# इंधन टंचाईत काळाबाजार फोफावला

प्रतिनिधी २९ मार्च

**महागाव** : तालुक्यातील पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी इंधनाचा काळाबाजार सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दिवसा 'नो स्टॉक'चे फलक लावून ग्राहकांना परतवणारे काही पंप चालक रात्रीच्या अंधारात मात्र चढ्या दराने इंधन विक्री करत असल्याची चर्चा रंगली आहे.

तालुक्यातील सुमारे दहा पेट्रोल पंप इंधन उपलब्ध नसल्याचे कारण देत बंद असल्याने वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या परिस्थितीचा फायदा घेत काही पंप चालक व एजंट संगनमताने ड्रम व कॅनमधून गुप्तपणे इंधन विक्री करत असल्याचे समोर येत आहे. यासाठी प्रति लिटर ४ ते ५ रुपये अधिक आकारले जात असल्याची माहिती पुढे येत आहे. शेतीकामांच्या हंगामात डिझेलची गरज वाढलेली असताना शेतकऱ्यांना नाईलाजास्तव जादा दराने इंधन घ्यावे लागत आहे. दिवसा नियमांचे पालन करण्याचा आव आणणारे संबंधित रात्री मात्र सर्व नियम धाब्यावर बसवत असल्याचे चित्र आहे. या प्रकारामुळे प्रशासनाच्या नियंत्रणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महागाव तहसील प्रशासन व पुरवठा विभागाने रात्रीच्या वेळी अचानक तपासणी मोहीम राबवून अशा प्रकारांना आळा घालावा, तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# महाशिवपुराण : राजेश आडे यांनी घेतला नियोजनाचा आढावा

प्रतिनिधी २९ मार्च



**आर्णी** : येथील महाशिवपुराण कथास्थळी राजेश आडे यांनी २७ मार्च रोजी भेट देत कार्यक्रमाच्या नियोजनाची पाहणी केली.

जगविख्यात कथाकार प्रदीप मिश्रा यांच्या कथामालेचे आयोजन ३० मार्च ते ५ एप्रिल २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.

समितीचे सदस्य म्हणून आडे यांनी कार्यक्रमाच्या विविध बाबींची सविस्तर माहिती घेतली.

तसेच पुढील जबाबदाऱ्या, व्यवस्थापनाची रूपरेषा आणि संभाव्य अडचणी यावर आयोजकांशी चर्चा केली.

यावेळी आयोजकांकडून सुरू असलेल्या नियोजनबद्ध कामकाजाचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडावा, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचेही त्यांनी सूचित केले.

# ट्रकची परस्पर विक्री; मालकाची लाखोंची फसवणूक

प्रतिनिधी २९ मार्च

**उमरखेड** : हप्ते भरण्याच्या स्पष्ट अटींवर घेतलेला दहाचाकी ट्रक करारातील सर्व अटी धुडकावून लावत परस्पर तिसऱ्या व्यक्तीला विकून टाकल्याची धक्कादायक घटना उमरखेड तालुक्यात उघडकीस आली आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगर येथील मालकाची लाखो रुपयांची फसवणूक झाली असून, उमरखेड पोलिसांनी पांढरकवडा येथील एका इसमाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील मोहम्मद युनुस हुसेन (वय ५७, रा. रोहीली गल्ली) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ट्रक क्रमांक MH 24 J 9808 (टाटा २५१८) अब्दुल रहीम परवेज अब्दुल गफार (वय ३५, रा. रचना ले-आऊट, पांढरकवडा) यांच्याकडे ४० हप्त्यांच्या अटीवर दिला होता. मात्र आरोपीने एकही हप्ता भरला नाही. उलट, उमरखेड येथील महागाव रोडवरील जलीलखान यांच्या गॅरेजमध्ये उभा असलेला ट्रक मालकाला कोणतीही पूर्वकल्पना न देता गुपचूप दुसऱ्या व्यक्तीला विकून टाकला.

या प्रकाराची माहिती समजताच मोहम्मद युनुस यांनी २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी उमरखेड पोलिस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा क्रमांक २२०/२०२६ नोंदवला असून, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१६ (२) अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोपी अब्दुल रहीम याचा शोध घेण्यात येत असून, ट्रक कोणाला विकला आणि विक्रीतून मिळालेली रक्कम कुठे वळवली, याचा सखोल तपास सुरू आहे. ट्रक जप्त करण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. वाहनांच्या हप्तेवारी खरेदी-विक्री व्यवहारात करारनामा असूनही अशा प्रकारचे विश्वासघातकी प्रकार वाढत असल्याने वाहन मालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक जण आता "करार करूनही सुरक्षितता नाही" अशी भीती व्यक्त करत आहेत. या प्रकरणी पोलिस तपास अधिक वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# मेटीखेडा अप्पर तहसीलदार कार्यालय 'शोभेची वास्तू

प्रतिनिधी २९ मार्च



**कळंब** : तालुक्यातील मेटीखेडा येथे २०१८ मध्ये सुरू करण्यात आलेले अप्पर तहसीलदार कार्यालय सध्या केवळ नावापुरतेच कार्यरत असल्याचे चित्र आहे. पूर्णवेळ अप्पर तहसीलदार नियुक्त नसल्यामुळे नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी कळम येथे जावे लागत असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.

मेटीखेडा परिसर हा आदिवासी बहुल भाग असून, कळम तहसील कार्यालय सुमारे ४० किलोमीटर अंतरावर आहे. ही अडचण लक्षात घेऊन तत्कालीन महसूल मंत्री संजय भाऊ राठोड यांच्या प्रयत्नातून येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यात आले होते. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सुमारे ४० गावे जोडण्यात आली आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून या ठिकाणी पूर्णवेळ अधिकारी नसल्याने जन्म-मृत्यू नोंदणी, आपसी वाटणी (८५/२), जमीन महसूल प्रकरणे तसेच १५५ अंतर्गत आदेश यांसारखी कामे रखडत आहेत. परिणामी, नागरिकांना पुन्हा कळम तहसील कार्यालयात जावे लागत आहे. याशिवाय परिसरातील अवैध रेती वाहतूक व वीटभट्ट्यांवर नियंत्रण ठेवण्यातही अडचणी निर्माण होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. आदिवासी भागातील नागरिकांना सुविधा मिळाव्यात या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या कार्यालयाचा हेतूच अपूर्ण राहत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून मेटीखेडा येथे पूर्णवेळ अप्पर तहसीलदार नियुक्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# महागावच्या दोन तरुणांची पोलीस दलात झेप

## मराठा सेवा संघातर्फे सत्कार

प्रतिनिधी २९ मार्च



**महागाव** : कठोर परिश्रम, अटळ जिद्द आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर ग्रामीण भागातील तरुणांनी यशाचे शिखर गाठले आहे. महागाव तालुक्यातील वाघनाथ येथील अभिजीत गजानन शिंदे आणि करंजखेड येथील अविनाश देविदास भांगे या दोन तरुणांची अकोला महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत पोलीस शिपाई पदावर निवड झाली आहे. या यशाबद्दल मराठा सेवा संघ, महागाव तालुक्याच्या वतीने दोन्ही गुणवंत तरुणांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे, दोन्ही तरुणांनी अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या 'ओपन' प्रवर्गातून हे यश मिळवले आहे. अभिजीत शिंदे यांनी १३४ गुण तर अविनाश भांगे यांनी १३३ गुण मिळवले. दोघांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले असून, माध्यमिक शिक्षण मातोश्री विद्यालय, महागाव येथे पूर्ण झाले. या यशात महागाव येथील अभ्यासिका सेंटरचे मार्गदर्शन व अभ्यासाचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठा सेवा संघातर्फे आयोजित सत्कार सोहळ्यात अभिजीत व अविनाश यांना तसेच त्यांच्या आई-वडिलांना प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून सन्मानित करण्यात आले. यावेळी 'शिवरायांचे शिवकार्य' हे प्रेरणादायी पुस्तक भेट देण्यात आले. समाजातील तरुणांनी अशा यशाचा आदर्श घेऊन शासकीय सेवेत रुजू व्हावे, असा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे, तालुका अध्यक्ष उदय नरवाडे, तालुका सचिव पंकज देशमुख, तालुका कार्याध्यक्ष सतीश ठाकरे, उपाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, प्रसिद्धीप्रमुख गजानन वाघमारे, राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव, मंगेश पाटील वानखेडे, राज पाटील, गजानन पाटील, गजानन शिंदे, सुचिता शिंदे यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना पदाधिकाऱ्यांनी म्हटले की, ग्रामीण तरुणांना योग्य संधी मिळाली तर ते राज्याच्या शासकीय सेवेत चमकू शकतात. अभिजीत आणि अविनाश यांच्या यशाने महागाव तालुक्यास अभिमान वाटतो. पोलिस दलात दाखल होऊन दोन्ही तरुण समाजसेवा करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# पेपर विक्रेत्याच्या घरातून दोन डॉक्टरांची झेप

प्रतिनिधी २९ मार्च



**उमरखेड** : अतिदुर्गम घमापूर गावातील जाधव कुटुंबाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या जोरावर यशाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पेपर विक्रीतून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या नंदकिशोर जाधव यांच्या जिद्दीमुळे कुटुंबातील दोन डॉक्टर घडल्याने परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

नंदकिशोर जाधव गेल्या दशकभरापासून पेपर विक्रीचा व्यवसाय करत कुटुंबाची जबाबदारी सांभाळत आहेत. मर्यादित उत्पन्न असूनही त्यांनी शिक्षणाला प्राधान्य देत कुटुंबातील सदस्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.

त्यांचे लहान भाऊ डॉ. विठ्ठल जाधव यांनी घमापूर येथे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर नांदेड व ढाणकी येथे पुढील शिक्षण पूर्ण केले. नीट परीक्षेत यश मिळवत त्यांनी नागपूर येथून बीएएमएस पदवी मिळवली असून सध्या संगमनेर येथे शस्त्रक्रिया विषयात उच्च शिक्षण घेत आहेत.

तसेच, नंदकिशोर जाधव यांचे पुतणे डॉ. गोपाल जाधव यांनीही कठीण परिस्थितीत शिक्षण पूर्ण करत फिजिओथेरपी पदवी संपादन केली असून ते सध्या कार्यरत आहेत.

या यशामागे नंदकिशोर जाधव व त्यांचे बंधू शंकर जाधव यांचे परिश्रम, तसेच कुटुंबातील महिलांचा त्याग महत्त्वाचा ठरला आहे. विशेष म्हणजे, पेपर विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नावरच हे शिक्षण पूर्ण करण्यात आले.

घमापूरसारख्या दुर्गम भागातून उभी राहिलेली ही यशोगाथा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शिक्षणाच्या बळावर परिवर्तन शक्य असल्याचा संदेश देत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. २९ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

शालार्थ आयडी घोटाळा, पैसा केला गोळा...







# शिक्षण विभागात घोटाळा पुन्हा पुन्हा, SIT च्या चौकशीतून दाखल होणार गुन्हा!

## * भरती थेट, बॅक डेट वरिष्ठांना केले सेट * शिक्षक होणार गार, बंद होणार पगार
## * विशेष शिबिरामध्ये दिलेल्या शेकडो मान्यतेची एसआयटीच्या मार्फत चौकशीची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम नागपूर विभागातच नव्हे तर राज्यातील सर्व विभागातील शिक्षण विभागात मागील अनेक वर्षापासून सुरू असलेल्या बोगस शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकरणाची शासनाने एसआयटीद्वारे चौकशी सुरू केली आहे. वाशीम जिल्ह्यात २००५ पासूनच माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागात 'बॅकडेट' मान्यता प्रकाराचा 'श्रीगणेशा' झाल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळयाबरोबरच २००५ पासून दिलेल्या सर्व शिक्षक,शिक्षकेत्तरांच्या मान्यता आदेशाची व बोगस भरतीची एसआयटीद्वारे सखोल चौकशी सुरू झाली असून जिल्ह्यात शिक्षण विभागात भ्रष्टाचार पुन्हा पुन्हा झाला असून आता गुन्हा दाखल होणार आहे.




वाशीम जिल्ह्यात माध्यमिक शिक्षण विभागात मागील २० वर्षात काही मोजक्या शिक्षणाधिकाऱ्यांचा अपवाद वगळता बहुतांशी शिक्षणाधिकाऱ्यांनी बोगस व बॅकडेटमध्ये शिक्षकांच्या व शिक्षकेत्तरांच्या शेकडो नियमबाह्य नियुक्त्यांना मान्यता देवून लाखोची माया जमा केली.त्यामध्ये काहींनी शिक्षणाधिकाऱ्यांने तर कोट्यवधीचा आकडा पार केला असल्याचीही शिक्षण विभागात चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागात विशेष शिबीराचे आयोजन करून तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी शेकडो बोगस नियुक्त्यांना मान्यता प्रदान करून लाखोचा मलिदा लाटला होता.'या' विशेष शिबीरासाठी कोणत्याही वरिष्ठांची मान्यता न घेताच तत्कालीन भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यांनी स्वत: मालामाल होवून कथित शिक्षण संस्थाचालकांनाही कोट्यवधीची कमाई करून दिल्याचे वास्तव आहे. लाभार्थी संस्थाचालकांमध्ये अनेक आजी - माजी लोकप्रतिनिधी, अल्पसंख्यांक संस्था चालक व अनेक दलालानी शिक्षणक्षेत्राचे पावित्र्य नष्ट करुन

### आजी-माजी लोकप्रतिनिधीच्या अल्पसंख्यांक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस भरती

शिक्षणक्षेत्राची 'वाट' लावल्याचीही चर्चा आहे. अमरावती विभागाचे माजी शिक्षण उपसंचालक रामधन पवार यांनी वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले.नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग,आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे ,तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यात मागील २० वर्षापासून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात बोगस व बॅकडेट मध्ये भरती प्रक्रिया खुलेआम सुरू आहे.माध्यमिक शिक्षण विभागात एक वर्षापुर्वी प्रभार असलेल्या अधिकाऱ्याने तर वाद असलेल्या संस्थासह,अल्पसंख्यांक संस्थेमध्ये नियमबाह्य मान्यता देवून कोट्यवधीची कमाई केल्याची पण शिक्षण विभागात खमंग चर्चा सुरु आहे. एसआयटीने वाशीम जिल्ह्यातील मागील २० वर्षात झालेल्या माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागातील घोटाळ्याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे. तरी एसआयटी विभागाने निपक्षपणे चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.

### घोटाळा आला गळ्यात, मोठा मासा जाळ्यात...

रविंद्र काटोलकर २४ डिसेंबर २०२१ रोजी नागपुरात प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून रुजू झाले. २० मार्च २०२२ पर्यंत ते जिल्हा परिषदेत असताना त्यांना अनेक शिक्षण व कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी बनावट असल्याची माहिती होती. परंतु वेतन संबंधात शाळेकडून आलेल्या प्रस्तावाची कुठलीही शहानिशा न करता त्यांचे थकीत वेतन देण्याची प्रक्रिया राबविली. त्यातून त्यांनी शासनाची १२ कोटींपेक्षा अधिक रकमेची शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली. शालार्थ आयडी घोटाळ्यातील अटकेतील आरोपींची संख्या आता एकूण २७ वर गेली आहे. यामध्ये तीन शिक्षण उपसंचालक, चार शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक, तीन मुख्याध्यापक, दोन शाळा संचालक यांच्यासह सहायक शिक्षक, सहा लिपीक व कनिष्ठ लिपीकांचा समावेश आहे. अशाच प्रकारची शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी वाशीम जिल्ह्यात झाल्यास अनेक मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे .




## थोडक्यात

### मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. शहरातील अकोला चौक, शेलुबाजार रोड, कारंजा रोड, आंबेडकर चौक,बसस्थानक चौक व मानोरा रोड व ,पोस्ट ऑफिस रोड इत्यादी भागात मोकाट गुरांचा वावर वाढला आहे तसेच या तील अनेक भागात मोकाट गुरांनी ठिय्या मांडलेला असतो त्यामुळे रहदारिस मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे.त्यामुळे शहरातील मोकाट गुरांचा बंदोबस्त करणे अतिशय आवश्यक आहे.




## हर घर नळ, अन् पाण्यासाठी तारांबळ...

# जल जीवन योजना नावाला, पाणी नाही गावाला!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

हर घर नल, हर घर जल या संकल्पेनेसह भारत सरकारने २०२४ पर्यंत सर्व ग्रामीण कुटुंबांना नळाद्वारे पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जल जीवन मिशन सुरू केले आहे. परंतु नियोजनशून्य कारभारामुळे ' ज्याच्या हाती ससा, तो पारधी ' अशी गत या महत्त्वाकांक्षी योजनेची झाली असल्याचे बोलले जात आहे. कमिशनखोरीमुळे कामाचा दर्जा खालावल्याने सदर योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप अनेक गावातील नागरिक करीत आहेत. तर काही ठिकाणी तांत्रिक अडचणीमुळे जल जीवनची कामे खोळंबली असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. परिणामी अनेक गावात या योजनेचा फज्जा उडाल्याचे चित्र समोर येत आहे.








या महत्त्वाकांक्षी योजनेला नव्याने गती मिळावी आणि खोळंबलेली कामे सबंधित प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी एक सामाजिक कर्तव्य म्हणून दैनिक सिटीन्यूज सुपरफास्टने युद्धपातळीवर जाऊन पाठपुरावा करण्याचे काम हाती घेतले आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या बाळखेड येथे भेट देऊन माहिती घेतली असता येथील धक्कादायक माहिती पुढे आली आहे. या गावात जल जीवन योजनेचे विहीर, पाईप लाईन, जलकुंभाचे काम पूर्ण झाले असून, गावातील नळ जोडणी आणि विहिरीवर विज जोडणी व मोटारपंप बसविण्याचे काम अपूर्ण असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. परिणामी सदर योजनेचे काम अर्धवट अवस्थेत पडून आहे. त्यामुळे हर घर नळ ही सरकारची घोषणा फोल ठरत असून नागरिकांची पाण्यासाठी तारांबळ उडत आहे.

जिल्ह्यात अनेक तालुक्यातील गावात साठवण प्रकल्पात असल्याने पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु पुढील कामे अर्धवट असल्याने येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. येथील महिलांना दूरवरून पिण्याचे पाणी डोक्यावर आणावे लागत असून अनेक ग्रामस्थ बैलबंडीवर मोठी टाकी बांधून आसपासच्या शेतातील विहिरीवरून पाण्याची गरज भागवीत असल्याचे पहावयास मिळाले आहे. भर उन्हाळ्याच्या दिवसात येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

परिणामी जल जीवन योजना नावाला, पाणी नाही गावाला असे अपरोधाने येथील ग्रामस्थ बोलत आहेत.

## कारंजातील शासकीय यंत्रणा निष्क्रीय...

# शहरात व तालुक्यात पुन्हा बोगस डॉक्टर सक्रिय!

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

### * बऱ्याच डॉक्टरची नावे पुढे येण्याची शक्यता
### * बिना डिग्रीचे हॉस्पिटल राजरोसपणे सुरू, आरोग्य विभाग झोपेत

कारंजा शहरात व तालुक्यात पुन्हा बोगस डॉक्टर सक्रिय होऊन रुग्णाच्या जीवनाशी खेळ सुरू केला आहे. सविस्तर माहिती अशी की काही वर्षांपूर्वी कारंजा शहरांमध्ये काही डॉक्टर बोगस डिग्री वापरून रुग्णाच्या जीवनाशी खेळत होते.तेव्हा याबाबत तक्रार होऊन मोठी कारवाई सुद्धा झाली होती.परंतु त्यानंतर आता पुन्हा कारंजा शहरांमध्ये बोगस डिग्री वापरून बरेच डॉक्टर आपले हॉस्पिटल चालवत आहे व पेशंटच्या जीवनाशी खेळत असून त्यांची फसवणूक करत आहे.याबाबत शहरांमध्ये काही डॉक्टरची चौकशी झाल्याचे समोर आले आहेत, शहरामध्ये बरेच डॉक्टर हे बाहेर गावातून आले आहे.आपल्या



हॉस्पिटलच्या बोर्डवर बोगस डिग्री लिहून रुग्णाची फसवणूक करत आहे.काही डॉक्टर जवळ तर डिग्री सुद्धा नाही.आणि ते राजरोसपणे हॉस्पिटल चालवतात, बऱ्याच हॉस्पिटलमध्ये नर्स सुद्धा शिक्षित नाही त्यांनी कोणत्याही प्रकारचा कोर्स केलेला नाही.अशा अशिक्षित नर्सच्या हाताने पेशंटला इंजेक्शन देणे,सलाईन देणे,टॅबलेट देणे अशी कामे केली जातात यामुळे पेशंटचे जीवन धोक्यात आलेले आहे.त्यामुळे बऱ्याच रुग्णांना आपला जीव सुद्धा गमवावा लागला.काही डॉक्टर तर पेशंटला स्वतः जवळचे औषध (टॅबलेट)देतात पेशंटला मेडिकल वर सुद्धा जाऊ देत नाही.आणि हे औषध अतिशय निष्कृष्ट दर्जाचे वापरले जातात,आणि अशा डॉक्टरांनी अमाणूसकीचा कहर केलेला आहे.तेव्हा आरोग्य विभागाने अशा डॉक्टरवर कारवाई करणे गरजेचे आहे.

रविवार स्पेशल

# निरागसता साठवू मनात, मुलींचे स्वागत करू घरात!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### *कन्याभ्रूणहत्या रोखण्यासाठी मोठे पाऊल
### * कायद्यांतर्गत मिळणार १ लाख रुपयांचे बक्षीस

**कन्याभ्रूणहत्येचा वाढता धोका आणि लिंग गुणोत्तर बिघडण्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात एक महत्त्वाची योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत अनधिकृत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविरोधात खात्रीशीर माहिती दिली, आणि त्यामुळे गुन्हा उघडकीस आला तर संबंधित माहितीदाराला रु. १ लक्ष रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.**

ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. तिचा उद्देश लिंग निवडीस प्रतिबंध घालणे, कन्याभ्रूण हत्या थांबवणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. विशेषतः जिल्ह्यातील नागरिक, आरोग्य कर्मचारी किंवा सामाजिक कार्यकर्ते यांनी यासाठी पुढे येणे गरजेचे आहे.



**योजनेची वैशिष्ट्ये :**

गर्भलिंग निदान प्रतिबंध, लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविणे आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी ही योजना आहे.

पीसीपीएनडीटी कायदा व एमटीपी कायद्यांतर्गत डिकॉय केस यशस्वी झाल्यानंतर तसेच न्यायालयीन प्रकरण दाखल झाल्यानंतर डिकॉय केस करीता मदत करणाऱ्या गर्भवती महिलेस सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत एक लक्ष बक्षीस देण्यात येणार आहे. गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्यान्वये राबविण्यात आलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्या नागरिकास रु. १ लक्ष बक्षीस देण्यात येते. ही माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येते व संबंधिताची ओळख जपली जाते. यासाठी http://amchimulgi.maha.in या पोर्टलवर नोंदणी करता येते. संपर्कासाठी राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५ किंवा १०४ मो. ८४८९८१४०६० वर संपर्क साधता येईल. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून कृपया या योजनेचा लाभ घ्या.

आपल्या माहितीद्वारे एका चिमुकल्या जीवाला जीवनदान मिळू शकते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. २९ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# निळे रॉकेल 65 रुपये लिटरने मिळण्याची शक्यता !
## मंजूर 72 हजार लिटर रॉकेल घेण्यासाठी उडणार झुंबड

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** गॅसच्या तुटवड्याला पर्याय म्हणून, सरकारने प्रत्येक शिधापत्रिकामागे ३ लिटर रॉकेल देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यभरात ३,७४४ केएल (३७.४४ लाख लिटर) रॉकेलची मागणी आहे. अकोला जिल्ह्याला ७२ हजार लिटर रॉकेलचा साठा मंजूर झाला आहे. प्रति कार्ड धारक तीन लिटर प्रमाणे केवळ २४ हजार लाभार्थ्यांना त्याचे वितरण करणे शक्य आहे. त्यामुळे उर्वरित लाभार्थ्यांचे काय? हा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. जिल्ह्यात ३ लाख २६ हजार कार्ड धारक आहेत.



प्रतिकार्ड धारकांना तीन लिटर प्रमाणे वाटप होईल त्यामुळे केवळ २४ हजार लाभार्थींना वाटप शक्य आहे. तर उर्वरित ३ लाख २ हजार कार्ड धारकांचे काय? हा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. गॅस सिलेंडर मिळत नसल्याने जनतेचा दबाव कमी करण्यासाठी सरकारने राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी रॉकेल कोटा निश्चित केला आहे.

सरकारने 'अ' श्रेणीच्या महानगरपालिका क्षेत्राला रॉकेल पुरवठ्यातून वगळले आहे. सरकारने अंत्योदय आणि प्राधान्य गट (केसरी) शिधापत्रिकांना रॉकेल देण्याचा निर्णय घेतला आहे. पांढऱ्या शिधापत्रिकांवर रॉकेल उपलब्ध होणार नाही. वाढत्या जनदबावानंतर, अन्न व नागरी पुरवठा विभागाने अंत्योदय आणि प्राधान्य गटांच्या शिधापत्रिकांची माहिती संकलित करून सरकारकडे पाठवली होती. त्यावर अकोला जिल्ह्याला ७२ हजार लिटर रॉकेलचा साठा मंजूर झाला आहे. सरकार निळ्या रॉकेलसाठी प्रति लिटर ६५ रुपयांपर्यंत दर आकारू शकते. कारण पांढरे रॉकेल सध्या बाजारात प्रति लिटर १०० रुपये दराने उपलब्ध आहे. जिल्ह्यात जवळपास २०१६ पासून रॉकेलचा पुरवठा बंद असल्याने घाऊक व अर्ध घाऊक विक्रेत्यांची साखळी, साठवण व्यवस्था विस्कळीत झाली आहे. रेशन दुकानदारांकडेही रॉकेल साठवणुकीची सध्या कोणती सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे रॉकेलचा पुरवठा व वितरण हे मोठे आव्हान पुरवठा विभागासमोर आहे. तसेच साठा अपुरा येणार असल्याने गावातील किती आणि कोणत्या कार्डधारकांना वितरण करावे हा मोठा प्रश्न रेशन दुकानधारकांसमोर निर्माण होणार आहे.

### आधी तीन महिन्याचे धान्य घ्यावे की रॉकेल पडणार मोठा प्रश्न

त्यातच आता लाभार्थ्यांना तीन महिन्याचे धान्य एकदाच मिळणार असल्याने राशन दुकानदारासमोर आधी धान्याचे वाटप करावे की रॉकेलचे वाटप करावे हा प्रश्न सुद्धा ठाकणार आहे. आधीच पॉस मशीन मध्ये लोकांचे अंगठे येत नसल्याने व सर्वांनी डाऊन असल्याने लाभार्थ्यांसोबत राशन दुकानदारही त्रस्त झाले आहेत त्यातच आता तीन महिन्याचे राशनचे धान्य वाटप करणे व त्यातच रॉकेलचे सुद्धा लाभार्थ्यांना वाटप करणे यात राशन दुकानदारांची चांगलीच कसोटी लागणार आहे. वेळप्रसंगी वाद होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

# पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव




प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा विशेष मोहिमेअंतर्गत दोन टप्प्यातील मूल्यमापनानंतर राज्यातील ३४ पोलिस अधीक्षक कार्यालयांमधून अकोला पोलिस अधीक्षक कार्यालय राज्यात तृतिय क्रमांकाचे ठरले. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. मंत्री आशीष शेलार, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ई गव्हर्नन्स कार्यक्रम राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आला. यामध्ये कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफीस, कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉटस्ॲप चॅटबॉट, कृत्रिम बुध्दिमत्ता व ब्लॉकचेनचा वापर आणि भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर या ७ घटकांवर सहभागी कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले.'१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल पोलिस अधीक्षक अर्चित चांडक व त्यांच्या चमूला प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

# मोर्णेच्या पात्रात जलकुंभी वाढल्याने नागरिक त्रस्त



प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** मोर्णा नदीच्या पात्रात जलकुंभी वाढल्याने नदी काठी राहणा-यांना त्रास सहन करावा लागतो आहे. डासांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळे समस्या देखील वाढल्या आहेत. महापालिका प्रशासनाने हाती घेतलेली मोहीम मध्येच का थांबवली असा प्रश्न विचारला जात आहे. जलकुंभी काढतानाचे फोटो सेशन करून प्रश्न सुटणार नाही. तर नदी पात्रात जलकुंभी दिसणार नाही याला प्राधान्य द्यावे लागेल असे नागरिकांचे म्हणणे आहे. त्याशिवाय ही समस्या सुटणार नाही. उन्हाळ्यात डास खूप त्रास देतात. त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. महापालिका प्रशासनाने नागरिकांना होत असलेला त्रास दूर करावा तसेच जलकुंभी काढण्याची मोहीम प्रभावीपणे राबवावी अशी मागणी केली जात आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार...
## ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट रुग्णांसाठी फायदेशीर

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.

माझे नांव गीताई, मला १० ते १२ वर्षापासून थायरॉईडचा त्रास होता, याकरिता मी नाईक होमिओपॅथी मध्ये उपचार करण्यांस सुरूवात केली. १ महिन्यात मला खुप चांगला परिणाम जाणवला. माझे वजन २ किलो कमी झाले. चेह-यावर आणि पायावरची सुज कमी झाली. माझे थायरॉईडचे रिपोर्ट नॉर्मल आलेत. मला येथे ८० टक्के समाधान आहे. डॉ. मला ६ महिन्याचा कोर्स करण्यास सांगितले आहे.

# उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दाणा पाण्याची सोय
## सर्पमित्र मुन्ना शेख दरवर्षी जोपासतात वसा

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** उन्हाच्या काहीलीने जसे आपण कासाविस होतो, तीच अवस्था पशुपक्ष्यांची देखील होते. उन्हाळ्याची चाहूल आता लागली असून, शहरातील तापमानाचा पारा दिवसागणिक वाढत आहे. अशाच परिस्थितीत पक्षाच्या तृश्नातृप्ती साठी अकोल्याच्या मुन्ना शेख यांनी पाणी पात्र तयार करून नवा आदर्श समाजापुढे ठेवला आहे.



अकोला जिल्हा उष्णतेसाठी प्रसिद्ध असून, येथील तापमान दरवर्षी ४० अंशापेक्षा अधिक असते. अशात मुक्या प्राण्यांसह पक्ष्यांचे खूप हाल होतात. अन्न-पाण्यासाठी त्यांना भटकंती करावी लागते. त्यामुळे उन्हाळ्यात अनेक संस्था, व्यक्तींकडून पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात येते. असाच अभिनव उपक्रम मागील काही वर्षांपासून निसर्ग संवर्धनचे शेख महम्मद शेख मकबूल उर्फ मुन्ना राबवित आहेत. यंदा ते अकोल्यासह बुलढाणा जिल्ह्यात २०० च्या आसपास पक्ष्यांच्या दाण्या पाण्यासाठी पात्रांचे वितरण करीत आहेत. अनेक वर्षांपासून पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करतात. दरवर्षी उन्हाळ्यात ते पक्ष्यांसाठी जलपात्रांचे वितरण नागरिकांना करतात.

यंदा त्यांनी तेलाच्या लोखंडी पत्राच्या पिप्यापासून पक्ष्यांसाठी लहान आणि मोठी अशा दोन आकारातील जलपात्रासोबतच अन्नाचीही व्यवस्था करता येईल, असे पात्र स्वतः घरीच तयार केले.

# भर उन्हात सिलिंडरसाठी वणवण अन टोईंग पथकाने महिलेची गाडी उचलली

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** तहसील कार्यालयासमोर 'नो पार्किंग'मधील आणि पिवळ्या पट्टयाबाहेर उभ्या असलेल्या दुचाकींवर शहर वाहतूक पोलीस आणि टोइंग पथकाकडून दररोज कारवाई होताना दिसते. ?आज एक महिला काही कामानिमित्त तहसील कार्यालयात आली होती. तिची दुचाकी पिवळ्या पट्टयाबाहेर उभी असल्याने वाहतूक पोलीस आणि टोइंग कर्मचारी तिची गाडी उचलून नेऊ लागले. हे पाहून त्या महिलेने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, ती ओरडू लागली आणि रडू लागली. शनिवारी दुपारी हा प्रकार घडला.



?ती महिला संतापून म्हणाली, 'आधीच गॅस सिलेंडर मिळत नाही, त्यात तुम्ही गाड्या उचलून नेताय. आमच्याकडे काय फुकटचा पैसा नाही.' तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या वाहतूक कर्मचाऱ्याने महिलेला विचारले की, तिची गाडी 'नो पार्किंग'मध्ये होती का? जर गाडी नो पार्किंगमध्ये असेल, तर दंड भरूनच ती सोडावी लागेल. त्यानंतर जेव्हा त्या महिलेला मोबाईलवर तिची गाडी नो पार्किंगमध्ये असल्याचे फोटो दाखवण्यात आले, तेव्हा ती अधिकच संतापली. 'आम्ही आधीच त्रासात आहोत, आम्हाला अजून त्रास देऊ नका,' असे ती म्हणाली. बराच वेळ समजवल्यानंतर अखेर कर्मचाऱ्यांनी त्या महिलेची गाडी सोडून दिली. या गोंधळामुळे काही काळ तिथे बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

# जैन मंदिरात उद्या महावीर जयंती महोत्सव

**अकोला :** जैन धर्माचे २४ वे तिर्थकर भगवान महावीर यांचा जयंती महोत्सव सोमवार, ३० मार्च रोजी उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. महोत्सवाचे आयोजन स्थानिक सैतवाल दि. जैन मंदिर किल्ल्याजवळ करण्यात येत आहे. त्यानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन कार्यकारिणीद्वारा करण्यात आले आहे. सकाळी ७.३० वाजता गांधी जवाहर बागेत असलेल्या महावीर स्तंभाचे पूजन करण्यात येईल. व तेथे सैतवाल सेवासंघ द्वारा प्रभावना वितरीत होईल. त्यानंतर सैतवाल दि. जैन मंदिरात सकाळी ९ वाजता भगवान महावीरांचे जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात भगवान महावीरांचा पाळणा, अंगाई गीत तथा भ. महावीरांचे चरित्र कथा व महिला मंडळाद्वारे होईल.

# सैन्यदलातील जवान सुशील तेलगोटे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला :** भारतीय सैन्यात सेवारत असलेले जवान सुशील तेलगोटे हे आपल्या मूळ गावी सुटीवर आलेले असताना त्यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांचा उपचारादरम्यान २७ मार्चला मृत्यू झाला. त्यांच्यावर २८ मार्चला अकोला येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पुलगाव येथील इंडीयन आर्मीच्या जवानांनी त्यांना सशस्त्र सलामी दिली. अंत्यसंस्कारावेळी जिल्हा प्रशासनातील अधिकारी, पोलिस प्रशानातील अधिकारी व शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.



जुने शहर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या हद्दीत आर्मी जवान सुशील तेलगोटे यांच्यावर त्यांच्याच मित्रांनी त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या जवानाचा अखेर शुक्रवारी रात्री उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. त्यांच्यावर २८ मार्च रोजी दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जवानावर जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून खेडकर यांनी पुष्पचक्र अर्पण केले. तसेच सैनिक कल्याण प्रतिनिधी परदेशी, १८ महार रेजिमेंट, एनसीसीचे प्रतिनिधी गवई, जीओसी हेडक्वॉटर्स पुलगावचे उदय राम, पोलिस खात्याचे पाटणकर आदींसह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुष्प अर्पण केले.

# केवायसीमध्ये चुकीच्या दुरुस्तीसाठी शेवटचे तीन दिवस

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अनेक महिलांच्या ई-केवायसीमध्ये चुकी झालेली आहे. त्यामुळे अनेक महिलांना डिसेंबरपासून आतापर्यंत हप्ता मिळालेला या नाही. कारणाने महिलांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना ई-केवायसीमध्ये चुकीची दुरुस्ती करण्यासाठी अंतिम मुदत ३१ मार्च देण्यात आली आहे. या मुदतीत अंगणवाडी केंद्र किंवा ऑनलाइन पोर्टलवरून दुरुस्ती न केल्यास १५०० रुपयांचा मासिक हप्ता कायमचा बंद होऊ शकतो. तसेच दुसरीकडे मात्र निकषामध्ये बाद झालेल्या अपात्र महिलांची संख्याही वाढली आहे.

# लिनेस क्लब ऑफ अकोलाची मासिक सभा, रामनवमी उत्सव साजरा !



प्रतिनिधी २९ मार्च




**अकोला:** २७ मार्च रोजी गोरक्षण रोडवरील 'टेस्ट ऑफ साऊथ' येथे लिनेस क्लबच्या मासिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. ही सभा रामनवमीच्या निमित्ताने घेण्यात आली. ?सभेच्या सुरुवातीला 'जय श्रीराम' च्या जयघोषात सर्वांचे स्वागत करण्यात आले. मान्यवरांना रामरायाची प्रतिमा असलेला दुपट्टा परिधान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी सुलेखा गुप्ता यांनी लता मंगेशकर यांची भूमिका साकारत देशभक्तीपर गीत सादर केले. तक्ष समनपुरे याने प्रभू रामाची भूमिका साकारली, तर शोभा राठी यांनी रामायणावर आधारित प्रश्नमंजुषा घेऊन उपस्थितांचे मनोरंजन केले. प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख यांनी क्लबतर्फे राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले आणि भविष्यातही लिनेस सखींचे असेच सहकार्य मिळत राहील, अशी आशा व्यक्त केली.क्लबच्या रिजन चेअरपर्सन ममताजी सूर्या यांचा वाढदिवस लिनेस अध्यक्षा राजेश्री समनपुरे जायसवाल यांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आला. त्यांना भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच २७ मार्च रोजीच संगीता भारतीजी यांचाही वाढदिवस असल्याने त्यांचाही केक कापून आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सभेच्या शेवटी 'बोर्ड मीटिंग' घेण्यात आली, ज्यामध्ये आगामी प्रकल्प आणि 'चार्टर डे' सेलिब्रेशनचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन लि. अनिशाजी वखारिया, लि. रुपलजी लोटीया, लि. शोभाजी राठी, लि. पुजाजी शर्मा, लि. स्वातीजी अग्रवाल आणि लि. संतोषजी लोहिया यांनी केले होते.सभेला लि. हरविंदरकौरजी सेठी, लि. आशाजी विरवानी, लि. रत्नमाला रुईकर, लि. इंद्राणी देशमुख, लि. राजश्री देशमुख, लि. उषाजी भादूका, लि. दिना शाह, लि. शितल अग्रवाल, लि. श्रद्धा जोशी, लि. बबिताजी खंडेलवाल, लि. सपना अग्रवाल, लि. आशा मोटवानी, लि. अरुदंती शिरसाट, लि. रिना ओरा, लि. मोसमी ठाकुर, लि. रचना खंडेलवाल, लि. सिमा खंडेलवाल, लि. माया तालोकार, लि. सरजेराव हिरवानी, लि. नम्रता अग्रवाल, लि. ममता अग्रवाल, लि. संध्या अग्रवाल, लि. धर्मिष्ठा वखारिया, लि. प्रेमा मुंदडा, लि. आशा पटेल, लि. रेखा शर्मा, लि. लक्ष्मी तोलानी, लि. मुक्ता घेई, लि. जयश्री भारती, लि. इंदु तिवारी, लि. नुपुर समनपुरे (जायसवाल) उपस्थित होत्या. सभा अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरित्या झाली.

# खैर मोहम्मद प्लॉट, हबीब नगर भागातील उघड्या डीपीमुळे अपघाताची शक्यता !
## विद्यार्थी आणि नागरिकांच्या जीवाशी खेळ

प्रतिनिधी २९ मार्च

**अकोला:** खैर मोहंमद प्लॉट हबीब नगर भागात उघडी डीपी धोकादायक बनली आहे. डॉ. झाकीर हुसेन स्कूल, शाह बाबू स्कूल आणि सर सय्यद स्कूल अशा तीन शाळा इथे आहेत. जिथून दररोज लहान मुले ये-जा करतात. त्याचबरोबर हा रस्ता डाबकी रोड, भगतवाडी आणि मदिना चौकाकडे जात असल्याने येथे नेहमीच पादचाऱ्यांची आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे महावितरणने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी आहे.




या परिसरातील डीपी नेहमी उघडी असते आणि त्यात थेट विद्युत प्रवाह असतो. जर एखाद्याला विजेचा धक्का लागून अपघात झाला, तर याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या गंभीर बाबीकडे रहिवाशांनी महावितरण यंत्रणेचे लक्ष वेधले. परंतु काही उपयोग झाला नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK
CMYK